छत्रपती शिवाजी चषक कबड्डी स्पर्धेच्या
अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : क्रीस्पर्धा-२०११/(प्र.क्र.४५/११)/क्रीयुसे-२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ३ जानेवारी, २०१२.

वाचा :- (१) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक- राक्रीधो-१०९६/प्र.क्र.३३०/क्रीयुसे-१, दिनांक २४ ऑक्टोबर,१९९७,
(२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक- राक्रीधो-१०९९/प्र.क्र.२६७/क्रीयुसे-१, दिनांक २४ जानेवारी,२०००.

प्रस्तावना :- महाराष्ट्रात देशी खेळाबाबत विशेषत: कबड्डीसारख्या देशी खेळांबाबत ग्रामीण व शहरी भागात विशेष आवड व आत्मीयता आहे. कबड्डी हा खेळ महाराष्ट्रात सर्वत्र खेळला जातो. देशातील इतर राज्यात व देशाबाहेरही कबड्डी खेळाचा प्रचार व प्रसार करण्यात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. राज्यातील कबड्डी खेळातील कामगिरी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उल्लेखनीय आहे. महाराष्ट्रात राष्ट्रीय स्तरावर पुरुष व महिलांसाठी दरवर्षी "छत्रपती शिवाजी चषक कबड्डी स्पर्धा" आयोजित करण्यास उपरोक्त दिनांक २४ ऑक्टोबर,१९९७ व दिनांक २४ जानेवारी,२००० च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

छत्रपती शिवाजी चषक कबड्डी स्पर्धेसाठी रु.२१.०० लाख एवढे अनुदान देण्यास उपरोक्त दिनांक २४ ऑक्टोबर,१९९७ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. तथापि, त्यानंतरच्या कालावधीत स्पर्धा आयोजनासंबंधातील विविध बाबींच्या वाढलेल्या खर्चामुळे गेल्या तीन वर्षात ज्या ज्याठिकाणी सदरच्या स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत त्याठिकाणी शासनाकडून देण्यात येणारे अनुदान व झालेला प्रत्यक्ष खर्च यामध्ये खूपच तफावत येत असल्याने सदर तरतूदीमध्ये वाढ करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन होता व त्याबाबत आता शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

: शा स न  नि र्ण य : छत्रपती शिवाजी चषक कबड्डी स्पर्धेच्या आयोजनासाठी देण्यात येणा-या सध्याच्या प्रतिवर्ष रु.२१.०० लाख या अनुदानामध्ये वाढ करुन ते प्रतिवर्ष रु.५०.०० लाख

एवढे करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचा सविस्तर तपशील सोबतच्या परिशिष्ट-"अ" मध्ये दिलेला आहे. संगणक सांकेतांक क्र. 201201040629101100001

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सोबत : परिशिष्ट-"अ"

( कि. शां. परब )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

(१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
(२) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
(३) मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
(४) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(५) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(६) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
(७) संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(८) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
(९) मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१०) मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(११) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी,
(१२) निवड नस्ती (क्रीयुसे-२).

F:\e drive\VAIJU\SPORTS-2KHO KHO ASSOCIATION-1.lwp

शासन निर्णय क्रमांक-क्रीस्पर्धा-२०११/(प्र.क्र.४५/११)/क्रीयुसे-२, दिनांक ३ जानेवारी,२०१२ सोबतचे

## परिशिष्ट-"अ"

## छत्रपती शिवाजी चषक कबड्डी स्पर्धेच्या खर्चाचा तपशील

| अ.क्र. | खर्चाचा तपशील | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १ | **प्रवास खर्च** (खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक, पंच, सामनाधिकारी व कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांना अंदाजे रु.६००/- प्रमाणे ७४० व्यक्ती x रु.६०० = | रु.४,४४,०००/- |
| २ | **भोजन खर्च** (७४० व्यक्ती, प्रतिदिन रु.२००/- प्रमाणे ७ दिवसांसाठी) ७४० x २०० x ७ = | रु.१०,३६,०००/- |
| ३ | **निवास खर्च** (७४० व्यक्ती, प्रतिदिन रु.२००/- प्रमाणे ७ दिवसांसाठी) ७४० x २०० x ७ = | रु.१०,३६,०००/- |
| ४ | **छत्रपती शिवाजी चषक प्रतिकृतींचा खर्च :** | रुपये |
| | १ पुरुष - प्रथम क्रमांक | २०,०००/- |
| | २ महिला - प्रथम क्रमांक | २०,०००/- |
| | ३ पुरुष - द्वितीय क्रमांक | १५,०००/- |
| | ४ महिला - द्वितीय क्रमांक | १५,०००/- |
| | ५ पुरुष - तृतीय क्रमांक | १०,०००/- |
| | ६ महिला - तृतीय क्रमांक | १०,०००/- |
| | एकूण : | ९०,०००/- |
| ५ | खेळाडू, व्यवस्थापक व मार्गदर्शक यांना पदक (मेडल) प्रति सेट रु.६००/- प्रमाणे (२८ व्यक्ती x रु.६००) = | रु.१६,८००/- |
| ६ | **रोख बक्षिसे :** | |
| | (अ) प्रथम क्रमांकाच्या पुरुष व महिला संघातील खेळाडू, मार्गदर्शक व व्यवस्थापक यांना प्रत्येकी रु.१५,०००/- प्रमाणे (२८ x रु.१५,०००) = | रु.४,२०,०००/- |
| | (ब) द्वितीय क्रमांकाच्या पुरुष व महिला संघातील खेळाडू, मार्गदर्शक व व्यवस्थापक यांना प्रत्येकी रु.१०,०००/- प्रमाणे (२८ x रु.१०,०००) = | रु.२,८०,०००/- |
| | (क) तृतीय क्रमांकाच्या पुरुष व महिला संघातील खेळाडू, मार्गदर्शक व व्यवस्थापक यांना प्रत्येकी रु.७,०००/- प्रमाणे (२८ x रु.७,०००) = | रु.१,९६,०००/- |
| | (ड) प्रत्येक दिवसाच्या सामन्यातील उत्तम पकड करणारा, उत्तम चढाई करणारा व सर्वोत्कृष्ट पुरुष / महिला खेळाडूस अनुक्रमे रु.५,०००/-, रु.५,०००/- व रु.१०,०००/- याप्रमाणे ५ दिवसांचे (२०,००० x २ x ५ = २,००,००० तसेच शेवटच्या दिवशी संपूर्ण स्पर्धेतील उत्तम पकड करणारा, उत्तम चढाई करणारा व अष्टपैलू सर्वोत्कृष्ट पुरुष / महिला खेळाडूस अनुक्रमे रु.७,०००/-, रु.७,०००/- व रु.१२,०००/- प्रमाणे (२६,००० x २ =५२,०००) | रु.२,५२,०००/- |
| ७ | सरपंच, पंच, अधिकारी व शासकीय अधिकारी, कर्मचारी एकूण - १०० मानधन रु.४००/- प्रमाणे ७ दिवस (१०० x ४०० x ७) | रु.२,८०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ८ | क्रीडांगण तयार करणे व देखभाल खर्च (माती, पाणी, रोलर, चुना, पोल, मैदान सेवक व इतर) | रु.१,००,०००/- |
| ९ | प्रेक्षक गॅलरी, क्रीडांगणावरील प्रकाश झोतासाठी व्यवस्था, विद्युत व्यवस्था, शामियाने, व्ही.आय.पी. आसन व्यवस्था, आसन व्यवस्था स्टेज व तद्नुषंगिक बाबींचा खर्च | रु.४,४९,२००/- |
| १० | सादिल खर्च :- उद्घाटन व समारोप, रोषणाई, प्रसिध्दी, बॅनर्स, साऊंड सिस्टिम, व्हिडिओ रेकॉर्डिंग व फोटो, छपाई, झेरॉक्स, आवश्यक क्रीडा साहित्य, स्टेशनरी, संगणक / फॅक्स / टेलिफोन / वाहतूक खर्च व स्पर्धेच्या अनुषंगाने होणारा इतर खर्च | रु.४,००,०००/- |
| | एकूण : | रु.५०,००,०००/- |

( कि. शां. परब )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

--------------

F:\e drive\VAIJU\SPORTS-2KHO KHO ASSOCIATION-1.lwp